# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.08.2026** **वारःसोमवार**

---

1. 2047 पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी युवा, गरीब, महिला आणि शेतकऱ्यांचं सक्षमीकरण होण्याची गरज- गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन,
2. एनटीए युजीसी-नेट च्या तीन विषयांची फेरपरीक्षा घेणार,
3. रेल्वे स्थानकांवर शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचं पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तातडीनं उपाययोजना करण्याचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे आदेश आणि,
4. एफआयएच हॉकी पुरुष विश्वचषक स्पर्धेत आज भारतीय संघाचा इंग्लंडशी सामना.

**अमित शहा**

भारताला 2047 पर्यंत पूर्णपणे विकसित बनवण्याचं स्वप्न साकार करण्यासाठी युवा, गरीब, महिला आणि शेतकऱ्यांचं सक्षमीकरण होण्याची गरज केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी काल व्यक्त केली. राजस्थानातल्या अलवर इथं राज्यातल्या 17 जिल्ह्यांमधल्या 6 हजार 453 कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी केल्यानंतर झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकारनं अनेक उपक्रम सुरू केले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आल्यापासून गेल्या 12 वर्षांत शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत वारंवार वाढवून दिली असल्याचं त्यांनी नमूद केलं.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कायापालट करण्यासाठी दुग्धव्यवसायात प्रचंड क्षमता असून दुग्धोत्पादन वाढवण्यासाठी चांगल्या प्रजातीच्या गायी म्हशी राजस्थानातल्या घराघरात उपलब्ध करून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**उपराष्ट्रपती**

पदवीधर विद्यार्थ्यांनी राष्ट्र प्रथम हे तत्त्व बाळगून आपलं ज्ञान, कौशल्य आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचा राष्ट्रउभारणीसाठी वापर करावा असं आवाहन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. चेन्नई जवळच्या कट्टनकुलथूर इथं एस आर एम या विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेच्या बाविसाव्या दीक्षांत समारंभात ते काल बोलत होते. 'विकसित भारत' बनण्याच्या देशाच्या प्रवासात भारताच्या तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, त्यामुळे त्यांनी अंमली पदार्थांपासून दूर राहून शिस्त, ध्येयनिष्ठा आणि उत्कृष्टतेचा मार्ग निवडावा असंही ते यावेळी म्हणाले.

**नेट फेरपरीक्षा**

युजीसी-नेट परीक्षेच्या इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या विषयाच्या प्रश्नपत्रिकांमध्ये अनेक चुका असल्याच्या तक्रारी आल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीएनं या तीन विषयांची फेर परीक्षा घेण्याची घोषणा केली आहे. येत्या 9 सप्टेंबरला सकाळी 9 ते दुपारी 12 या पहिल्या सत्रात इंग्रजी विषयाची तर दुपारी 3 ते संध्याकाळी 6 या दुसऱ्या सत्रात वाणिज्य विषयाची फेरपरीक्षा होईल. तर समाजशास्त्र विषयाची फेरपरीक्षा दुसऱ्या दिवशी 10 सप्टेंबरला सकाळी 9 ते दुपारी 12 या वेळात होईल. एनटीएनं 22 ते 30 जून या कालावधीत युजीसी-नेटसाठी सर्व 87 विषयांची परीक्षा घेतली होती.

**ब्रिक्स पर्यावरण-मंत्री**

भारताच्या वतीनं उद्या नवी दिल्लीत 'ब्रिक्स' गटातील देशांच्या पर्यावरण मंत्र्यांच्या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. या बैठकीपूर्वी आज 'ब्रिक्स'चा पर्यावरण कार्यगट तसंच हवामान बदल आणि शाश्वत विकासासंबंधीच्या संपर्क गटाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. भारतानं आपल्या यावर्षीच्या 'ब्रिक्स'च्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळासाठी ठरवलेल्या 'अनुकूलन, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वततेसाठी पायाभरणी' या मध्यवर्ती संकल्पनेअंतर्गत या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांच्या अध्यक्षतेखाली 'ब्रिक्स' पर्यावरण मंत्र्यांची बैठक होणार आहे. अध्यक्षपदाचा भाग म्हणून भारतानं 'ब्रिक्स' पर्यावरण कार्यगटांतर्गत मुख्यत्वे विचार करण्यासाठी शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन, वनीकरण, वणवा व्यवस्थापन आणि आपत्तीची स्थिती हाताळण्याची सक्षमता, चक्रीय अर्थव्यवस्था आणि अनुकूलन ही चार प्राधान्य क्षेत्रं निश्चित केली आहेत. असं पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून सांगण्यात आलं.

**पुणे ब्रिक्स**

पुण्यात आजपासून पाच दिवसांच्या सातव्या ब्रिक्स माहिती आणि दूरसंचार अर्थात आयसीटी कार्यगटाच्या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. सक्षम भविष्यासाठी नावीन्य, सहकार्य आणि परिवर्तन या विषयसूत्रावर आधारित ही बैठक होणार आहे.

**अनुभव पुरस्कार**

कार्मिक, सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्तीवेतन विभागाचे राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत 2026 या वर्षासाठीचे 'राष्ट्रीय अनुभव पुरस्कार ' वितरित करण्यात येणार आहेत. याच कार्यक्रमात 'पेन्शन मित्र' हँडबुक आणि' पाचव्या देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहीमे'साठीच्या मार्गदर्शक सूचनांचंही प्रकाशन केलं जाणार असल्याचं कार्मिक, सार्वजनिक तक्रार आणि निवृत्तीवेतन मंत्रालयानं म्हटलं आहे. तसंच, या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून बँक प्रदर्शनाचही आयोजन करण्यात आलं आहे, त्यामध्ये 17 निवृत्तीवेतन वितरण करणाऱ्या बँकांनी निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीच्या तयार केलेल्या योजना आणि सेवा सादर केल्या जातील.

**वाजपेयी-पुण्यतिथी**

दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल देशभरात त्यांना आदरांजली वाहण्यात आली. नवी दिल्लीतील 'सदैव अटल' या त्यांच्या समाधीस्थळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक नेत्यांनी अटलजींच्या समाधीवर पुष्पांजली अर्पण केली. राजस्थानातील चितोडगढ इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते वाजपेयी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं तर, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉक्टर मोहन यादव यांच्या हस्ते काल इंदौर इथं प्रस्तावित असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांच्या 25 फूटी पुतळ्याची पायाभरणी करण्यात आली.

**रेल्वे स्थानक-पेयजल**

रेल्वे स्थानकांवर शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचं पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तातडीनं  उपाययोजना करण्याचे आदेश रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिले आहेत. पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत 'कॅग' नं दिलेल्या अहवालाच्या पार्श्वभूमीवर, वैष्णव यांनी काल दिवसभर संपूर्ण रेल्वे नेटवर्कवरील पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेचा आढावा घेतला. प्रवाशांना सुरक्षित आणि स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध  होण्यासाठी तातडीनं चुका सुधारण्याबाबतच्या उपाययोजना करण्याचे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. या उपाययोजनांचा एक भाग म्हणून, रेल्वे नेटवर्कवर सुमारे 20 हजार ठिकाणी टाकीपासून नळापर्यंत पाणी गाळण्याची आणि त्यावर देखरेख ठेवणारी नवीन प्रणाली बसवली जाईल

**गतिशक्ती**

'पंतप्रधान गतिशक्ती' उपक्रमांतर्गत, विविध मंत्रालयांच्या 18 लाख कोटी रुपये अंदाजित खर्च असलेल्या 396 पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या मंजुरीसाठी शिफारस करण्यात आली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, यापैकी 256 प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून, त्यातील 198 प्रकल्पांची अंमलबजावणी सुरू आहे.

**ओमान विद्यार्थी**

मस्कतमधील भारतीय शाळांमध्ये शिकणाऱ्या 200 हून अधिक विद्यार्थ्यांनी काल सुलतान काबूस बंदरावरील 'आयएनएस इम्फाळ' या भारतीय युद्धनौकेला भेट दिली, ओमानमधील भारतीय दूतावासानं ही माहिती दिली. तत्पूर्वी, भारताच्या स्वातंत्र्यदिनी मस्कत, पोंटा डेलगाडा आणि जिबूती यांसारख्या परदेशातील विविध बंदरांवर भारतीय युद्धनौकांच्या उपस्थितीद्वारे देशाच्या सागरी सामर्थ्याचं दर्शन घडल्याचं भारतीय नौदलानं सांगितलं. ओमानमधील भारताचे राजदूत प्रशांत पिसे यांनी या युद्धनौकेला भेट देऊन नौकेवरील नौदलाच्या कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. या युद्धनौकेवरील कर्मचाऱ्यांनी दूतावासात आयोजित ध्वजारोहण समारंभात सहभाग घेतला.

**अमरनाथ यात्रा**

जम्मू-काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यातील प्राचीन अमरनाथ' मंदिरासाठीची 12 दिवसांची वार्षिक 'श्री बुढा अमरनाथ यात्रा' आज सकाळी कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत सुरू झाली. ही यात्रा 28 ऑगस्टपर्यंत चालणार असून रक्षाबंधनादिवशी तिची सांगता होईल. प्रशासनानं राजौरी, पुंछ आणि प्रवासाच्या मार्गांवर कडेकोट बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था लागू केली आहे.

**नेपाळी अटक**

पश्चिम बंगालमधील भारत-नेपाळ सीमेवरून बेकायदेशीररीत्या सोने आणि चांदी घेऊन येणाऱ्या दोन नेपाळी नागरिकांना 'सशस्त्र सीमा बला'च्या जवानांनी काल अटक केली. सिलीगुडीजवळील पानीटांकी इथं तैनात असलेलं SSB चं पथक 'न्यू मेची पुलावर नियमित तपासणी करत असताना, त्यांनी नेपाळहून भारतात येणारी एक मोटार अडवली. या मोटारीतील दोन्ही व्यक्ती या सोने आणि चांदीबाबतची कोणतीही कागदपत्रे सादर करू शकल्या नाहीत किंवा त्याबद्दल कोणतंही समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांना ताब्यात घेण्यात आलं.

**हॉकी**

एफआयएच हॉकी पुरुष विश्वचषक स्पर्धा 2026 मध्ये भारतीय संघाचा सामना आज इंग्लंडशी होणार आहे. या सामन्यात विजयी होणारा संघ ड गटात अव्वल स्थान पटकावून थेट उपांत्य फेरीत जाणार असल्यानं या सामन्याला विशेष महत्व आहे. या आधी झालेल्या सामन्यांमध्ये भारतानं वेल्स संघावर तर विजय मिळवला आहे.

महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेत भारताने बलाढ्य चीनला काल 2-2 असं बरोबरीत रोखलं. भारताकडून नवनीत कौर आणि दीपिकाने गोल केले.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.